# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील दत्तवाडी पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- १९/०७/२०१८

दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे अक्षय शिवाजी किरतकिर्वे, वय २० वर्षे, रा. १३० दांडेकर पुल पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ०९/२०१८ दिनांक १९/०७/२०१८ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम जखमी करणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, सामाईक इरादा, खून करण्याचा प्रयत्न, दुखापत पोहोचविण्याच्या इराद्याने अंगावर धावून जाणे, नुकसान करणे, बेकायदेशिर जमावात सामील होणे, दंगा करणे, समान उदिष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमावात सामील होणे, स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने अश्लिल शब्दोच्चार, हावभाव, कृती करणे, रस्ता आडविणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, खून, घातक शस्त्र जवळ बाळगणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द दत्तवाडी, विश्रामबाग आणि डेक्कन पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची दत्तवाडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये दहशत असल्याने त्यास ज्योति प्रिया सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आणि पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.